**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर**

**आजीवन अध्ययन व विस्तार विभाग**

# महाविद्यालयांनी कार्यान्वित करावयाच्या चतुर्विध प्रकल्पाची मार्गदर्शिका – 2024–2025

## सह–अभ्यासक्रम उपक्रम (CC अंतर्गत)

| संस्कार | सहयोग | उन्नती |
|---|---|---|










## SEC/OE अंतर्गत

**सक्षम**




संस्कार, सहयोग आणि उन्नती ह्या प्रकल्पांची निवड CC अंतर्गत करता येईल. सक्षम हा अभ्यासक्रम आहे व सदर अभ्यासक्रम SEC (Skill Enhancement Courses) अथवा OE (Open Elective) अंतर्गत राबविला जाईल. विद्यार्थी सक्षम अंतर्गत विविध कौशल्य आधारित अभ्यासक्रम (2 किंवा त्यापेक्षा जास्त Credit चे) कोणत्याही सत्राला SEC अथवा OE अंतर्गत नोंदणी करू शकतात.

## *राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ*
## *आजीवन अध्ययन व विस्तार विभाग*
## *महाविद्यालयांनी कार्यान्वित करावयाच्या*
## *उन्नती व संस्कार तसेच सक्षम व सहयोग प्रकल्पांची मार्गदर्शिका*
## *2024—2025*

*राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील पूर्वीच्या निरंतर, प्रौढ शिक्षण आणि विस्तार विभागाचे नाव आता बदलले आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम—2016 (म्हणजे नवीन विद्यापीठ कायदा) नुसार आता या विभागाचे नाव* ***आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग*** *असे झाले आहे. या अधिनियमातील कलम—46 नुसार विद्यापीठात विस्तार सेवा कार्याला गती देण्यासाठी* ***आजीवन अध्ययन व विस्तार मंडळ*** (Board of Lifelong Learning and Extension) *स्थापित करण्यात आले आहे. या मंडळाद्वारे* ***आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या*** *माध्यमातून विद्यापीठ आणि महाविद्यालयांमधून विस्तार सेवा कार्यक्रम कार्यान्वित केले जातात.*

*महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम 2016 मध्ये नमूद विद्यापीठांच्या उद्दिष्टांचा मागोवा घेतल्यास काही उद्दिष्टांची पूर्ती करण्यासाठी विस्तार सेवा उपक्रमांशिवाय अन्य दुसरा पर्याय नाही, असे दिसते. विद्यापीठा*

*ला भारताच्या संविधानात नमूद केलेले स्वातंत्र्य, धर्मनिरपेक्षता, समता, व सामाजिक न्याय यांचे संवर्धन करून सर्वोत्तम मूलतत्वे व मूल्ये यांची राष्ट्रीय विकासाच्या दृष्टीने जोपासना करून सामाजिक, आर्थिक परिवर्तनाची प्रेरक शक्ती म्हणून कार्य करावयाचे आहे. सामाजिक सलोखा, सहजीवन, एकात्मिक मानवता आणि गरिबातल्या गरिबांची उन्नती करण्यासाठी तसेच समाजात अनुकूल वातावरण निर्माण करण्यासाठी विद्यापीठाला चालना द्यावयाची आहे.*

### *उच्च शिक्षणाची त्रिवेणी*

*विद्यापीठ अनुदान आयोगाने उच्च शिक्षणाची* ***शिकविणे*** (Teaching) ***संशोधन*** (Research) *व* ***विस्तार सेवा*** (Extension Services) *अशी तीन आवर्तने स्वीकारली आहेत. या तीन मुख्य घटकांवर देशातील उच्चशिक्षण पध्दती आज कार्यरत असून विद्यापीठे व महाविद्यालये त्या दिशेने कार्यरत आहेत. महाविद्यालयांमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम शिकविण्याचे वा अध्यापनाचे काम अध्यापक नियमितपणे करतात. त्याचबरोबर अध्यापक संशोधनाचे कार्यदेखील पार पाडतात. सर्वच विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये ही दोन्ही कार्ये सातत्याने सुरू असतात. परंतु उच्चशिक्षणाचे तिसरे आवर्तन म्हणून मान्य असलेल्या विस्तार सेवा कार्यात मात्र सर्वच अध्यापक व विद्यार्थी सहभागी होत नाहीत. विद्यापीठे आणि महाविद्यालये समाजविकासाच्या प्रक्रियेत प्रेरक असावीत, अशी अपेक्षा केली जाते. अर्थातच ही अपेक्षा विस्तार सेवा कार्यक्रमांच्या नियोजनपूर्वक आयोजनातूनच खात्रीलायकरित्या पूर्ण होऊ शकते.*

*विद्यापीठांना स्थानिक, प्रादेशिक व राष्ट्रीय विकासाच्या समस्यांमध्ये जवळून सहभागी होऊन ज्ञान आणि कौशल्य यांचा लाभ व्यक्ती व समाज यांच्या विकासासाठी उपलब्ध करून द्यावयाचा आहे. तसेच एक सजग व वस्तुनिष्ठ समीक्षक म्हणून विद्यापीठांना आपली जबाबदारी पार पाडावयाची आहे. समाजातील दुर्बल घटकातील व्यक्तींमध्ये आत्मसन्मान व प्रतिष्ठेची निर्मिती करणे व ती वाढविण्याचे कार्यदेखील विद्यापीठांना करावयाचे आहे.*

## *विस्तार कार्यातून सामाजिक सहभागः*

*विद्यापीठासमोर अधिनियमामधून ठेवलेली उद्दिष्टे पार पाडण्यासाठी आणि* NEP-2020 *चा विचार केल्यास विद्यापीठांना आपले कर्तव्य म्हणून अभ्यासक्रमांमध्ये विस्तार सेवांची तरतूद करावी लागेल. विस्तार सेवा कार्यान्वयनासाठी व्यवस्था निर्माण करावी लागेल. यासाठी विद्यापीठाचे विविध शैक्षणिक विभाग तसेच महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमांचा एक भाग म्हणून विद्यार्थ्यांना सहभागी करून घेता येईल. त्यांच्या सहकार्याने राज्य व राष्ट्रीय विकासविषयक योजनांचे मूल्यमापन, विविध विकासविषयक योजनांची पाहणी व त्यांच्याशी संबंधित असलेली आकडेवारी, आधार सामुग्री व इतर तपशील यांचे संकलन इत्यादी कार्य विद्यापीठाला करता येईल.*

*आपल्या विद्यापीठाचा विचार करता विस्तार सेवा कार्य करण्यासाठी आणि कौशल्य प्रशिक्षण देण्यासाठी आजीवन अध्ययन व विस्तार विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग कार्यरत आहेत. या विभागांच्या माध्यमातून संलग्नित महाविद्यालये तसेच विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग यामधून लोककल्याणार्थ विस्तार सेवा उपक्रमांचे आयोजन सातत्याने होत आहे.*

*विद्यापीठाचे मा. कुलगुरू या मंडळाचे अध्यक्ष आहेत. विभागाच्या नामबदलाबरोबरच विभागाच्या कामांतही बरेच बदल सुचविण्यात आले आहेत. आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या माध्यमातून आता ही बदललेली उद्दिष्टे पार पाडावयाची आहेत.*

### *उद्दिष्टेः*

1) *महाविद्यालयीन अध्ययनक्रमात कौशल्यविकास अभ्यासक्रमांची/उपक्रमांची अंमलबजावणी करणे.*
2) *विस्तार कार्याच्या माध्यमातून* Internship/Training, On job training (OJT) *यांची व्यवस्था करणे.*
3) *ज्येष्ठ नागरिकांना सर्वस्तरीय सहयोग करणे.*
4) *विविध संशोधन आणि तंत्रज्ञान यांची माहीती व्यक्ती व समाजापर्यंत पोहचविणे.*
5) *केंद्र व राज्याच्या विविध शासकीय योजनांसंबंधी लाभार्थ्यांना माहिती, मार्गदर्शन व समन्वयन करणे.*

*उपरोक्त उद्दिष्टांना अनुसरून नवीन उपक्रम आयोजित करण्याचे मंडळाने आता ठरविले आहे.*

*नवीन बदलांनुसार प्रत्येक महाविद्यालयात* ***'आजीवन अध्ययन व विस्तार केंद्र'*** *स्थापन करावयाचे आहे. या केंद्रांतर्गत विभागाचे पुढील चार प्रकल्प कार्यान्वित करायचे आहेत. प्रत्येक विद्यार्थ्याला मार्गदर्शक संहितेनुसार खालील प्रकल्पात सहभागी होणे आवश्यक आहे.*

***हे चार प्रकल्प पुढील प्रमाणे :***

***1) संस्कारः राष्ट्रसंत संस्कार प्रकल्प – सह–अभ्यासक्रम उपक्रम (CC अंतर्गत)***

***2) सहयोगः ज्येष्ठ नागरिक सहयोग प्रकल्प – सह–अभ्यासक्रम उपक्रम (CC अंतर्गत)***

***3) उन्नती : Extension Activities, Outreach programme, ग्राम विकास, कल्याणकारी – सह –अभ्यासक्रम उपक्रम (CC अंतर्गत)***

***4) सक्षम : कौशल्य, रोजगार आणि प्रशिक्षण विकास प्रकल्प – SEC/OE अंतर्गत***

***शासकीय योजनांची माहिती, मार्गदर्शन व समन्वयन प्रकल्प***

*यापुढे वरील सर्वच प्रकल्पांत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना विभागाच्या प्रोत्साहनपर श्रेयांकाचा (Credits) लाभ घेता येईल. त्याची माहिती पुढीलप्रमाणे:*

***1) 'संस्कार' – सह अभ्यासक्रम उपक्रम (CC अंतर्गत)*** *या प्रकल्पांतर्गत राष्ट्रसंतांच्या संस्कारक्षम साहित्यावरील कोणत्याही एका विषयावर आधारित ग्राम/शहर विकासाचा प्रकल्प आराखडा सहभागी विद्यार्थ्याला सादर करावा लागेल. आराखडा तयार करण्याकरिता संदर्भ ग्रंथांची यादी दिलेली आहे. विद्यार्थ्याने संदर्भ ग्रंथाचे यथोचित वाचन करून नियमावलीमध्ये दिलेल्या विषयांपैकी कोणत्याही एका विषयावर प्रकल्प आराखडा सादर करावयाचा आहे. त्याचे मूल्यमापन केल्यावर* Rubrics *नुसार ठराविक गुण दिले जातील. (सविस्तर माहितीकरिता प्रपत्र 'ब' बघावे.)*

***2) 'सहयोग' – सह अभ्यासक्रम उपक्रम (CC अंतर्गत)*** *आजच्या युगात विद्यार्थ्यांचा भावनिक विकास घडवून आणणे अत्यंत आवश्यक आहे. त्यांच्या मनामध्ये जेष्ठ नागरिकांबददल कणव निर्माण होणे गरजेचे आहे. त्याकरिता सहयोग प्रकल्पांतर्गत जेष्ठ नागरिक सहयोग प्रकल्प राबविण्यात येते. हा प्रकल्प शहरी आणि ग्रामीण भागातील जेष्ठ नागरिकांसाठी कार्यान्वित करावयाचा आहे. ज्येष्ठ नागरिकांचे जीवन सकारात्मक बनविणे, त्यांच्यासाठी सहकार्य, देखरेख, प्रेम, जिव्हाळा निर्माण करण्यासाठी विद्यार्थ्यांना सहभागी करून घेणे, ज्येष्ठांचे विविध क्षेत्रातील अनुभव विद्यार्थ्यांना मिळावेत याकरिता हा उपक्रम अत्यंत महत्वाचा आहे. याकरिता महाविद्यालयीन स्तरावर विविध कार्यक्रम/उपक्रमांचे आयोजन करण्यात यावे. त्यासाठी योग्य नियोजन, उपक्रमाची कार्यवाही, मूल्यमापन आणि अहवाल लेखन करणे अनिवार्य आहे. (सविस्तर माहितीकरिता प्रपत्र 'ड' बघावे.)*

***3) 'उन्नती' – सह अभ्यासक्रम उपक्रम (CC अंतर्गत)*** *प्रकल्पांअंतर्गत* Extension Activities, Outreach programme, *ग्राम विकास कल्याणकारी शासकीय योजनांची माहिती, मार्गदर्शन व समन्वयनाचे काम सहभागी विद्यार्थ्याला करावे लागेल. हा लाभार्थीकेंद्रित प्रकल्प आहे. सदर योजनांच्या लाभार्थ्यांशी तसेच प्रकल्पाची अंमलबजावणी करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था कार्यालयाशी संवाद व समन्वय साधून हा प्रकल्प तडीस नेता येईल. त्यावर आधारित एक 'व्यष्टि–अध्ययन अहवाल'* (Case Study Report) *विद्यार्थ्याला तयार करावा लागेल. या संबंधी सविस्तर माहिती प्रकल्पाच्या सोबतच दिली आहे.* ***या 'व्यष्टि अध्ययन अहवालांचे' (Case Study Report) मूल्यमापन करूनच ठराविक गुण दिले जातील.*** *(सविस्तर माहितीकरिता प्रपत्र 'इ' बघावे.)*

***4) 'सक्षम' – SEC/OE अंतर्गत*** *या प्रकल्पांतर्गत विद्यार्थ्यांमधील कौशल्य विकासावर भर देण्यात आलेला आहे. आपल्या जीवनामध्ये रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी त्यांना कौशल्य अवगत करून सक्षम बनविण्याकरिता हा उपक्रम महत्वाचा आहे. विविध प्रशिक्षण व रोजगारभिमुख अभ्यासक्रम विभागाव्दारे चालविल्या जातात. या अभ्यासक्रमातून त्यांची सक्षमतेतून रोजगाराकडे अशी वाटचाल घडवून आणता येते. यासाठी विद्यार्थ्यांना कौशल्य, रोजगार आणि प्रशिक्षण विकास प्रकल्पात सहभागी होणे आवश्यक आहे. ज्या अभ्यासक्रमांना मान्यता देण्यात आलेली आहे तेथे विद्यार्थ्यांनी आपली नोंदणी करावी. अभ्यासक्रमांची यादी विद्यापीठाच्या वेगसाईटवर देण्यात आलेली आहे. त्या ठिकाणी त्यांना सक्षम व प्रशिक्षित केल्या जाते. अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर त्यांची परिक्षा घेवून मूल्यूमापन केल्यानंतर प्रमाणपत्र वितरीत केल्या जाते. (सविस्तर माहितीकरिता प्रपत्र 'क' बघावे.)*

*महाविद्यालयांनी कार्यान्वित करावयाच्या* ***'संस्कार', 'सहयोग', 'उन्नती'*** *आणि* ***'सक्षम'*** *या चार प्रकल्पांची सविस्तर माहिती सोबत दिली आहे. (प्रपत्र 'ब', 'क', 'ड' आणि 'इ')*

*उपरोक्त चारही प्रकल्पांच्या सफल कार्यान्वयनासाठी प्रत्येक महाविद्यालयात प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली एक आजीवन अध्ययन व विस्तार कार्यान्वयन समिती नेमावयाची असून त्याची रचना पुढीलप्रमाणे असेलः*

| | | |
|---|---|---|
| *1. प्राचार्य* | – | *अध्यक्ष* |
| *2. समन्वयक प्राध्यापक* | – | *सदस्य(सचिव)* |
| *3. प्रकल्पशः 3 सहसमन्वयक प्राध्यापक* | – | *सदस्य* |
| *4. प्रकल्पशः 3 विद्यार्थी प्रमुख* | – | *सदस्य* |
| *5. एक उद्योजक (शहराकरिता) किंवा शेतकरी (ग्रामीण भागाकरिता)* | – | *सदस्य* |
| *6. एक प्रतिष्ठित ज्येष्ठ नागरिक* | – | *सदस्य* |
| *7. गट विकास अधिकारी* | – | *सदस्य* |
| *8. एक सामाजिक कार्यकर्ता* | – | *सदस्य* |
| *9. एक माध्यम प्रतिनिधी* | – | *सदस्य* |

*सर्व महाविद्यालयांनी आजीवन अध्ययन व विस्तार कार्यान्वयन समिती नेमून त्याबाबतची माहिती प्रत्येक वर्षी 1 ऑक्टोबर पर्यंत आजीवन अध्ययन व विस्तार विभागाला सादर करावी.*

*महाविद्यालयातील आजीवन अध्ययन व विस्तार केंद्र हे सामाजिक सहयोगाचे व एकात्मिक विकासाचे एक केंद्र व्हावे, ही अपेक्षा आहे. या दृष्टीनेच उपरोक्त सर्व उपक्रमांची रचना केली आहे. या प्रकल्पांमुळे महाविद्यालय व समाज यात एक संवादाचा सेतू निर्माण होईल. सहभागी विद्यार्थी* ***विकासदूत*** *म्हणून कार्यरत होतील तर समन्वयक प्राध्यापक विकासदर्शी!*

*नव्या सर्व प्रकल्पांसाठी आपल्या सहकार्याची अपेक्षा अणि आपल्या केंद्राला हार्दिक शुभेच्छा.*

**– sd –**

***29 ऑगस्ट, 2024*** ***संचालक***

# CC प्रोत्साहनपर गुणांसाठी निर्धारित मार्गदर्शक तत्वे (GUIDELINES)

## 2024–2025

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ अध्यादेश क्र.1 (2010) कलम (ब) नुसार आजीवन अध्ययन व विस्तार कार्यात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर गुण देण्यासंबंधीची मार्गदर्शक तत्वे (GUIDELINES) आजीवन अध्ययन व विस्तार मंडळाने दरवर्षी निर्धारित करावयाची आहेत. त्यानुसार सत्र 2024–2025 करीता आजीवन अध्ययन व विस्तार विभागाने मा. कुलगुरूंच्या मान्यतेनुसार प्रोत्साहनपर श्रेयांकासंबंधीची (Credit) मार्गदर्शक तत्वे निर्धारित केली आहेत. (Credit framework)

१. आजीवन अध्ययन व विस्तार विभागाद्वारे चालविण्यात येणाऱ्या **संस्कार, सक्षम, सहयोग आणि उन्नती** या प्रकल्पांमध्ये महाविद्यालयातील/विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागातील कोणत्याही विद्याशाखेतील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना सहभागी करण्यात यावे. उदा. बी.ए., बी.कॉम., बी.एस.सी, एम.ए, एम.कॉम, एम.एस.सी, एम.बी.ए याप्रमाणे.

---

संस्कार, सक्षम, उन्नती यासोबतच, **सहयोग** हा प्रकल्पही महाविद्यालयांना राबवायचा आहे. याप्रकल्पांमध्ये कोणत्याही शाखेचे तसेच कोणत्याही (1 ते 4) सत्राचे कितीही विद्यार्थी सहभागी होवू शकतात. याबाबतची माहिती प्रपत्र 'अ' मध्ये भरून प्राचार्यांच्या सहीनिशी 2024–2025 या शैक्षणिक वर्षामधील विषम सत्राकरिता दिनांक 10 ऑक्टोबर 2024 व सम सत्राकरिता 31 जानेवारी 2025 पर्यंत आजीवन अध्ययन व विस्तार विभागाला पाठविण्यात यावी.

---

२. **उन्नती** प्रकल्पांतर्गत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना प्रकल्पाच्या मार्गदर्शक संहितेंप्रमाणे (Rubrics नुसार) व्यष्टि–अध्ययन अहवाल (Case Study Report) सादर करणे आवश्यक आहे.

३. व्यष्टि–अध्ययन अहवाल महाविद्यालयातील/शैक्षणिक विभागातील समन्वयक प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली तयार करावयाचे असून ते महाविद्यालयाकडे/शैक्षणिक विभागाकडे प्रत्येक वर्षी विषम सत्राकरिता दिनांक 28 ऑक्टोबर 2024 व सम सत्राकरिता 28 फेब्रुवारी 2025 पर्यंत सादर करणे अनिवार्य राहील. **(विद्यार्थ्यांच्या परीक्षेचा आसन कमांक प्राप्त होताच ताबडतोब विभागाला सादर करावे.)** विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेल्या व्यष्टि–अध्ययन अहवालांवर समन्वयक प्राध्यापक आणि प्राचार्यांची/विभागप्रमुखांची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांनी तयार केलेले व्यष्टि–अध्ययन अहवाल समन्वयक प्राध्यापकांनी तपासून त्यावर उत्कृष्ट, चांगला आणि साधारण यापैकी कोणताही एक अभिप्राय नमूद करणे आवश्यक आहे.

४. विद्यार्थ्यांच्या व्यष्टि–अध्ययन अहवालांचे मूल्यांकन महाविद्यालयीन स्तरावर आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या मार्गदर्शनाखाली विषम सत्राकरिता 11 नोव्हेंबर 2024 व सम सत्राकरिता 10 मार्च 2025 पर्यत तज्ञ समितीकडून करून घ्यावे व त्यासंबंधीची माहिती आजीवन अध्ययन व विस्तार विभागाला त्वरित पाठवावी. मूल्यमापनासंबंधी सविस्तर वेळापत्रक महाविद्यालयांना स्वतंत्ररित्या पाठविण्यात येईल.

५. आजीवन अध्ययन व विस्तार विभागांतर्गत फक्त 3 प्रकल्पांचा अंतर्भाव CC साठी होईल.
संस्कार – 1 श्रेयांक (Credit)
उन्नती – 1 श्रेयांक (Credit)
सहयोग – 1 श्रेयांक (Credit)
एका सत्रामध्ये विद्यार्थ्यांना 2 श्रेयांकाचा प्रकल्प पूर्ण करायचा असून उन्नती हा प्रकल्प आवश्यक आहे म्हणजेच संस्कार किंवा सहयोग ह्यापैकी एकच प्रकल्प उन्नती सोबत निवडायचा आहे.

६. *प्रोत्साहनपर गुणांची वर्गवारी पुढीलप्रमाणे राहील.*

**Rules for Extension Project:**

a. There are three types of extension projects viz. Sanskar, Unnati and Sahyog having 1 credit each.
b. A student of any affiliated college can opt for a course under this category.
c. A student opting for 'Extension Project' as CC must opt any two projects out of above three type of projects out of three Unnati is compulsory for each semester.
d. Details of the scope and other guidelines about these projects can be obtained from the official website of the Lifelong Learning & Extension Department.

**Evaluation Rubrics**

| **Criteria** | **MAXIMUM POSSIBLE MARKS** | **Rubric / गुणांचे वाटप** | | | |
|---|---|---|---|---|---|
| Attendance and Participation in Sanskar, Unnati and Sahyog LLE activities | 20 | Attendance Equal to or more than 75% = 20 Marks | Attendance 60% t0 75% = 15 Marks | Attendance more than or equal to 50% = 10 Marks | Below 50% attendance = 5 Marks |
| Sanskar Prakalpa Participation and submission of *Rural Urban Development plan based on Literature & works of Rashtrasant Tukadoji Maharaj* | 40 | Report evaluation in excellent grade = 40 marks | Report evaluation in satisfactory grade = 30 marks | Report evaluation in average grade = 20 marks | Report evaluation in below average grade = 10 Marks |
| Unnati participation and submission of case studies of the *beneficiaries of individual/common development schemes floated by the Central/State government.* | 40 | 4 or more cases compiled = 40 marks | Upto 3 cases compiled = 25 marks | 1 to 2 cases compiled = 15 marks | Participation but no case complied = 5 marks |
| Sahyog participation and submission of Sahyog project report *related to senior citizens issues and activities* | 40 | Detailed Report containing senior citizen related 3 or more activities = 40 Marks | Detailed Report containing senior citizen related 2 or more activities = 25 Marks | Detailed Report containing senior citizen related 1 or more activities = 15 Marks | Participation but no report submission = 5 Marks |
| Bonus Marks for participation in any of the other CC activities in the SAME SEMESTER | Additional Max 10 marks per CC Activity | Marks to be allotted such that the total Marks under all heads should not be more than 100 | | | |

७. *विद्यार्थ्यांच्या प्रोत्साहनपर श्रेयांकासाठी* (Credit) *महाविद्यालयांना / पदव्युत्तर शैक्षणिक विभागांना मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांच्याकडे शिफारस करावयाची आहे त्यासाठी तज्ञ समितीकडून प्राप्त झालेले प्रोत्साहनपर गुण संबंधित महाविद्यालयांच्या / शैक्षणिक विभागांच्या कार्यक्रम अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे आसन क्रमांक प्राप्त होताच परीक्षा विभागाकडून प्राप्त झालेल्या प्रपत्रामध्ये* Lifelong Learning and Extension *च्या रकान्यामध्ये भरुन प्राचार्यांच्या / विभागप्रमुखांच्या आणि कार्यक्रम अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीसह मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांच्याकडे शिफारस करावयाची आहे त्यासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांच्याकडे त्वरीत पाठविण्यात यावे. परीक्षा विभागाच्या मागणीनुसार* Online *सुध्दा पाठविण्यात यावे. प्रपत्र* हे A4 *साईजवर असावे.*

*विद्यार्थ्याला प्रथम 4 सत्रा पर्यंत प्रत्येकी 2 श्रेयांकाचा* CC *आहे त्यासाठी विद्यार्थ्यांना* CC *अंतर्गत* NSS, NCC *खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम आणि आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे तीन प्रकल्प म्हणजेच संस्कार, सहयोग आणि उन्नती यापैकी कोणत्याही एकाची (गरजेनुसार दुसऱ्याची अतिरिक्त 10 गुणांकरिता) निवड करता येईल.*

*विद्यार्थ्याला* CC *अंतर्गत चार वेळा आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या प्रकल्पांची निवड करता येईल.*

*विद्यार्थ्याजवळ CC साठी अनेक पर्याय उपलब्ध असल्यामुळे विद्यार्थी आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या प्रकल्पांची निवड करेलच असे नाही पण जर विद्यार्थ्यांनी चारही सत्राला CC अंतर्गत आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे प्रकल्प घेण्याचा निर्णय घेतल्यास खालील प्रमाणे विद्यार्थ्यींना प्रकल्प निवडता येईल.*

*1. उन्नती या प्रकल्पाची प्रत्येक सत्राला निवड करणे आवश्यक असल्यामुळे विद्यार्थी उन्नती अंतर्गत प्रत्येक सत्राला वेगवेगळया सरकारी योजनांची निवड करू शकतो. उदा. समजा विद्यार्थ्यांने प्रथम सत्राला अनुसूचित जाती या लक्ष गटासाठी प्रधानमंत्री आवास योजना निवडली असेल तर पुढील सत्रामध्ये हा विद्यार्थी ही योजना पुन्हा घेवू शकणार नाही. तर पुढील सत्रात त्याला कुठल्याही वेगळया योजनेचा अभ्यास करावा लागेल.*

*2. त्याच प्रमाणे उन्नती सोबत सत्र एक मध्ये विद्यार्थ्यांनी जर संस्कार प्रकल्पाची निवड केली असेल तर त्याला संस्कार प्रकल्पांतर्गत 24 पर्याय मिळतील. त्यामधून विद्यार्थांने कोणत्याही एका विषयाची निवड करून त्या विषयावर आधारित एक ग्राम किंवा शहर विकासाचा प्रकल्प आराखडा सादर करायचा आहे. या विद्यार्थ्यांने जर पुढील सत्रात सुध्दा संस्कार प्रकल्पाचीच निवड केली असेल तर त्याने पुढील सत्रात कुठल्याही दुसऱ्या विषयाची निवड करून सदर विषयावर आधारित ग्राम किंवा शहर विकासाचा प्रकल्प आराखडा तयार करणे अनिवार्य आहे.* ***कुठल्याही परिस्थितीत एकाच विषयावर एकाच विद्यार्थ्यांने दोन वेळा प्रकल्प आराखडा सादर केल्यास त्याला ग्राहय धरण्यात येणार नाही.***

*3. जर एखादया विद्यार्थ्यांने संस्कार ऐवजी सहयोग प्रकल्पाची निवड केली तर त्याला वृध्द व्यक्तींशी निगडीत समस्यांवर काम करायचे आहे. सहयोग प्रकल्पांच्या उद्दिष्टानुसार सदर विद्यार्थी महाविद्यालयीन स्तरावरील कृतीगटाचा सदस्य म्हणून महाविद्यालयीन स्तरावर सहयोगव्दारे विविध कार्यक्रम व उपक्रमांचे आयोजन करेल. असे करत असतांना एका सत्रामध्ये विद्यार्थ्यांने वृध्दांशी संबंधीत कोणत्याही एका समस्येवर काम करणे अपेक्षित आहे. सदर विद्यार्थ्यांने जर पुढील सत्रात सुध्दा सहयोग प्रकल्पाची निवड केली असेल तर त्याने पुढील सत्रात वृध्दांशी संबंधीत इतर समस्येवर काम करायचे आहेत. असे करत असतांना सहयोग प्रकल्पांच्या 10 उद्दिष्टांना योग्य न्याय द्यावयाचा आहे. तसेच महाविद्यालयीन स्तरावर आयोजीत करायचे उपक्रम दिलेल्या मार्गदर्शिकेनुसार पूर्ण करायचे आहेत. मार्गदर्शिकेमध्ये दिल्यानुसार व CC रूब्रीक (Rubrics) मध्ये नमूद केल्याप्रमाणे विद्यार्थ्याने एका सत्रात वृध्दांशी संबंधीत एका समस्येवर तीन उपक्रम करायचे आहेत व एका उपक्रमासाठी दहा तासांचा वेळ अपेक्षित आहे या दहा तासात नियोजन, कार्यवाही, मूल्यमापन व अहवाल लेखन या सर्वांचा वेळ समाविष्ट आहे म्हणजेच सहयोग अंतर्गत एका श्रेयांकासाठी तीन उपक्रम तीस तासात वरीलप्रमाणे पूर्ण करणे अपेक्षित आहे.*

*थोडक्यात उन्नती प्रकल्पामध्ये प्रत्येक सत्रात वेगळया योजनेचा अभ्यास करायचा आहे. तर संस्कार प्रकल्पामध्ये प्रत्येक सत्रात वेगळया विषयावर आधारित मार्गदर्शक प्रकल्प आराखडा तयार करायचा आहे. तसेच सहयोग प्रकल्पामध्ये प्रत्येक क्षेत्रात वृध्दांशी संबंधित वेगवेगळया समस्येवर कार्य करायचे आहे.*

*उन्नती प्रकल्पामध्ये विद्यार्थी शासनाच्या विविध कल्याणकारी/शासकीय/विकास योजनांना जनसामान्यांपर्यंत पोहचविण्याचे काम करणार आहे. त्यासाठी महाविद्यालयाने कोणत्याही एका लक्ष्य गटाकडे आपले प्रयत्न एकवटले तर त्याचा समाजाला, महाविद्यालयाला तसेच विद्यापीठाला योग्य फायदा होईल.*

*महाविद्यालय आजीवन अध्ययन व विस्तार विभागांतर्गत सत्र एक, दोन, तीन व चार मध्ये CC अंतर्गत खालील प्रमाणे प्रकल्पांची निवड करू शकतील.*

***माहितीसाठी उदाहरण***
***सत्र एक – उन्नती – संस्कार/सहयोग***
***सत्र दोन – उन्नती – संस्कार/सहयोग***
***सत्र तीन – उन्न्ती – संस्कार/सहयोग***
***सत्र चार – उन्नती – संस्कार/सहयोग***

*महाविद्यालय आपल्या सोयीनुसार उन्नतीसोबत संस्कार/सहयोग प्रकल्पाची निवड करू शकतो. सर्व विद्याशाखांना सत्र (सेमिस्टर) परीक्षा पध्दती लागू असल्याने संबंधीत सत्राचे (सेमिस्टरचे) आसन कमांक प्राप्त होताच (प्रोत्साहनपर) गुण मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांच्याकडे पाठवावेत.*

# प्रस्ताव प्रपत्र

## (प्राचार्यांनी भरून पाठवायचे प्रारूप)

1) महाविद्यालयाचे /शैक्षणिक विभागाचे नांव व पूर्ण पत्ता : ..........................................................................
..........................................................................
भ्रमणध्वनी क्रमांक : ..........................................................................
E-mail ID : ..........................................................................

2) प्राचार्यांचे/ विभागप्रमुखांचे नांव : ..........................................................................
भ्रमणध्वनी क्रमांक : ..........................................................................
व्यक्तिगत email – id : ..........................................................................

3) समन्वयक प्राध्यापकाचे नांव : ..........................................................................
भ्रमणध्वनी क्रमांक : ..........................................................................
व्यक्तिगत email – id : ..........................................................................

4) एकुण विद्यार्थी संख्या (प्रवेशित–सर्व वर्षाचे) : ..........................................................................

5) प्रकल्पशः सहभागी विद्यार्थी संख्या (कोणत्याही विद्याशाखेतील कोणत्याही प्रथम/व्दितीय/तृतीय/चतुर्थ सत्रातील विद्यार्थ्यांना सदर प्रकल्पात सहभागी करण्यात यावे.) :

1) संस्कार प्रकल्प (वर्गनिहाय यादी जोडावी)

| मुले | मुली | तृतीयपंथी | एकूण |
|---|---|---|---|
| | | | |

2) सक्षम प्रकल्प (वर्गनिहाय यादी जोडावी)

| मुले | मुली | तृतीयपंथी | एकूण |
|---|---|---|---|
| | | | |

3) सहयोग प्रकल्प (वर्गनिहाय यादी जोडावी)

| मुले | मुली | तृतीयपंथी | एकूण |
|---|---|---|---|
| | | | |

4) उन्नती प्रकल्प (वर्गनिहाय यादी जोडावी)

| मुले | मुली | तृतीयपंथी | एकूण |
|---|---|---|---|
| | | | |

6) प्रकल्पशः सहकार्य करणाऱ्या : 1)...........................................................
सहसमन्वयक प्राध्यापकांची नावे : 2)...........................................................
(भ्रमणध्वनी क्रमांकही द्यावेत) : 3)...........................................................

7) विस्तार सेवा कार्यक्रमात : 1)...........................................................
सहकार्य करणाऱ्या : 2)...........................................................
परिसरातील संस्थांची नावे

8) इतर माहिती : ..........................................................................
..........................................................................

प्राचार्यांची/विभागप्रमुखांची स्वाक्षरी

### राष्ट्रसंत संस्कार प्रकल्प

# संस्कार

*विद्यापीठाचा केंद्रबिंदू विद्यार्थी असल्यामुळे विद्यार्थ्यांपर्यत राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा प्रगतिशील व प्रयत्नवादी विचार पोहोचणे क्रमप्राप्त ठरते. वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे विसाव्या शतकातील एक क्रांतदर्शी महापुरुष होते. त्यांनी आध्यात्म आणि विज्ञान यांचा समन्वय साधून लोकजागृतीचे व आदर्श ग्राम निर्मितीचे कार्य जीवनभर केले. विकसीत भारताची संकल्पना अस्तित्वात आणण्यासाठी त्यांच्या ग्रामविकास कार्यक्रमांचा अभ्यास करण्याची नितांत गरज आहे. आजीवन अध्ययन व विस्तार मंडळाने मा. कुलगुरुंच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयीन/पदव्युत्तर शैक्षणिक विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी प्रस्तुत प्रकल्प सुरु केला आहे. राष्ट्रसंतांच्या साहित्यात व्यक्तीविकास, ग्रामविकास व राष्ट्रविकासाची दृष्टी असल्यामुळे* ***राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ग्रंथसंपदेवर आधारित कोणत्याही एका विषयावर*** *प्रत्येक विद्यार्थ्याने किमान एक ग्राम/शहर विकासाचा प्रकल्प आराखडा तयार करणे अनिवार्य आहे. प्रस्तुत आराखडा तयार करतांना विद्यार्थ्यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची ग्रंथसंपदा वाचणे आवश्यक आहे. आराखडा तयार करण्याकरिता संदर्भ ग्रंथांची यादी दिलेली आहे. विद्यार्थ्याने संदर्भ ग्रंथाचे यथोचित वाचन करून नियमावली मध्ये दिलेल्या विषयांपैकी कोणत्याही एका विषयावर प्रकल्प आराखडा सादर करावयाचा आहे. आराखडा कागदाच्या दोन्ही बाजूस, पुरेसा समास सोडून, सुवाच्च अक्षरात किंवा टाईप करून दिलेल्या विशिष्ट नमून्यात लिहिण्यात यावा. प्रकल्प आराखडा तयार करण्यासाठी खालील विषयांपैकी कोणत्याही एका विषयाची निवड करावी.*

***विषय :***

| | | | |
|---|---|---|---|
| ग्रामगीता आणि ग्राम स्वच्छता अभियान | ग्राम कौशल्यातून ग्रामीण विकास | राष्ट्रसंतांच्या विचारातील आदर्श ग्राम | ग्रामगीता आणि संघटन कौशल्य |
| ग्रामगीता आणि ग्रामगीतेतील आदर्श गावाची संकल्पना | ग्राम विकासाकरिता ग्रामोदयोगाचा मार्ग | राष्ट्रसंतांची आदर्शग्राम विकासाची दृष्टी | ग्रामगीता आणि जीवन शिक्षण |
| ग्रामगीतेतून ग्रामविकास | सर्वोन्नतीचा विद्यार्जनपथ म्हणजे ग्रामगीता | राष्ट्रसंतांच्या ग्रामीण विकासाच्या विचारांची प्रासंगिकता | ग्रामगीता आणि अंधश्रध्दा निर्मूलन |
| ग्रामगीतेतील बेरोजगारी निर्मूलनाचा मार्ग | ग्रामगीतेतील समाज जीवन | ग्रामगीतेतील मानवतेची शिकवण | राष्ट्रसंतांचे समाज शिक्षण विषयक विचार |
| ग्रामगीता आणि राजकारण | राष्ट्रसंतांचे ग्रामीण शिक्षणातील योगदान | ग्रामगीता आणि महिलोन्नती | ग्रामगीता आणि ग्राम निर्माण |
| ग्रामगीतेतील ग्रामोंन्नतीचा आदर्श मार्ग | राष्ट्रसंतांचे ग्रामीण विकासातील योगदान | ग्रामगीता आणि आरोग्य शिक्षण | ग्रामगीता आणि ग्राम रक्षण |

*विद्यार्थ्यांनी उपरोक्त एका विषयावर तयार केलेला* ***एक मार्गदर्शक प्रकल्प आराखडा*** *विभागाला सादर करणे अनिवार्य आहे. त्यावर* Rubric *नुसार गुणांची शिफारस मूल्यमापन समितीकडून करण्यात येईल.*


***संदर्भ ग्रंथ :***
1. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज – ग्रामगीता
2. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज – माझी आत्मकथा
3. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज – जपान भाषणे
4. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज – भारत साधुसमाज साधना
5. सुदाम सावरकर – राष्ट्रसंतांचे जीवनदर्शन

प्रपत्र 'ब/1'

## राष्ट्रसंत संस्कार प्रकल्प
## प्रकल्प आराखडा खालील नमुन्यात तयार करावा.

**अ) विद्यार्थ्यांची माहिती :**

1. पूर्ण नाव : ..........................................................................................
2. वर्ग : ..........................................................................................
3. महाविद्यालयाचे नाव : ..........................................................................................
4. भ्रमणध्वनी कमांक : ..........................................................................................
5. ई–मेल आय.डी. : ..........................................................................................
6. पूर्ण पत्ता : ..........................................................................................

**ब) प्रकल्पाचा आराखडा :**

1. निवडलेला विषय : ..........................................................................................
2. विषय निवडीमागील पार्श्वभूमी (कमाल 250 शब्दमर्यादा)
3. निवडलेल्या विषयावरील प्रकल्प आराखडयाचा गोषवारा (कमाल 250 शब्दमर्यादा)

**क) प्रकल्प आराखडयातील महत्वाचे घटक :** (कमाल 3000 शब्दमर्यादा)

1. विषयाची प्रस्तावना :–
2. प्रकल्पाची उद्दिष्टे :–
3. प्रकल्प क्षेत्राची माहिती :–
4. प्रकल्प क्षेत्रातील समस्या :–
5. प्रकल्प क्षेत्रातील सकारात्मक (चांगल्या) बाबी :–
6. ग्राम/शहर विकास प्रकल्पाचे नियोजन :–
7. ग्राम/शहर विकास प्रकल्पाची कार्यवाही :–
8. ग्राम/शहर विकास प्रकल्पात येणाऱ्या अडचणी :–
9. ग्राम/शहर विकास प्रकल्पासाठी लागणारी आर्थिक तरतुद :–
10. प्रकल्प आराखडयाचे मूल्यमापन :–
11. निष्कर्ष शिफारसी व उपाययोजना :–
12. संदर्भ ग्रंथ, अनुसूची, प्रश्नावली, कात्रणे, फोटो व इतर.

**अशाप्रकारे प्रकल्प आराखडयातील घटकांचा समावेश करून प्राचार्य व मार्गदर्शकाच्या प्रमाणपत्रावर सहीनिशी अहवाल लेखन करून विभागांस सादर करावा.**

# ज्येष्ठ नागरिक सहयोग प्रकल्प
# सहयोग

## पार्श्वभूमी

विज्ञान, तंत्रज्ञान व वैद्यकशास्त्रातील अभूतपूर्व प्रगतीमुळे मनुष्याचे जीवनमान उंचावले आहे. त्याचे सरासरी वय पण वाढले आहे. त्यामुळे शहरी व ग्रामीण अशा दोन्ही भागात ज्येष्ठ नागरिकांची संख्या वाढली आहे. नजीकच्या भविष्यात तर ती अधिकच वेगाने वाढणार आहे.

वयाची 60 वर्षे पूर्ण केलेले स्त्री–पुरूष ज्येष्ठ नागरिक म्हणून ओळखले जातात. 80 वर्षापेक्षा जास्त वय असलेल्या व्यक्ती अतिज्येष्ठ नागरिक म्हणून संबोधल्या जातात. ज्येष्ठ नागरिकांसाठी केंद्र व राज्य शासनाद्वारे अनेक योजना सुरू करण्यात आल्या आहेत. परंतु माहितीअभावी, संपर्कअभावी व सुयोग्य मार्गदर्शनाअभावी बहुतेकवेळा या योजना त्यांचेपर्यंत पोहचत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे.

वयोवृध्द शेतकरी, मजूर, कामगार, कर्मचारी यापैकी सर्वचजण अंशतः किंवा पूर्णतः निवृत्त होत असतात. ज्या कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन मिळते त्यांना आर्थिक समस्या इतरांच्या तुलनेत नसते. परंतु इतरांना मात्र आर्थिक समस्यांसह अस्वास्थ्य, एकटेपणा आणि इतर अनेक प्रकारच्या समस्या भेडसावतात. उमेदीच्या वयात समाजासाठी/ कुटुंबासाठी/ नातेवाईकांसाठी योगदान दिलेल्या ज्येष्ठ व्यक्तीच्या वाट्याला दुःख, अवहेलना व अपमान येत असेल व त्यास वृध्दाश्रमाचा रस्ता धरावा लागत असेल तर ते कोणासाठीच भूषणावह ठरत नाही. उचित देखभाल, प्रेम आणि जिव्हाळयाचा अभाव, माहितीचा व संपर्काचा अभाव इत्यादी अनेक कारणांमुळे ही स्थिती उद्‌भवत असते.

ही पार्श्वभूमी लक्षात घेता आजीवन अध्ययन व विस्तार विभागाद्वारे ज्येष्ठ नागरिकांसाठी **'सहयोग'** हा प्रकल्प अंगिकारण्यात आला आहे. हा प्रकल्प शहरी तसेच ग्रामीण भागातील ज्येष्ठांसाठी कार्यान्वित करावयाचा आहे.

## ज्येष्ठ नागरिक 'सहयोग' प्रकल्पाची उद्दिष्टे

1. ज्येष्ठ नागरिकांचे जीवन सकारात्मक व उत्पादनक्षम बनविणे
2. प्रकल्प परिसरातील ज्येष्ठ नागरिक मंडळामध्ये समन्वय साधणे
3. प्रकल्प परिसरात आवश्यकतेनुसार ज्येष्ठ नागरिक मंडळाची स्थापना करणे
4. ज्येष्ठ नागरिकांचा विद्यापीठे, ग्रंथालये, संशोधन संस्था आणि सांस्कृतिक केंद्रांमध्ये सहभाग व संपर्क वाढविणे
5. ज्येष्ठ नागरिकांचा सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा व इतर क्षेत्रातील अनुभव, तसेच ज्ञान व कौशल्यांचा तरूण पिढीला लाभ व्हावा, यासाठी कार्यक्रमांचे नियोजन करणे
6. वृध्दाश्रमांची गरज पडू नये याकरिता उपाययोजना सूचविणे
7. ज्येष्ठ नागरिकांचा सहभाग असलेले विविध उपक्रम राबविणे व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणे
8. ज्येष्ठ नागरिकांसाठी गायन, वादन, संगीत, भाषण, वादविवाद, स्वयंस्फूर्त भाषण स्पर्धा, अंताक्षरी व प्रश्नमंजुषा इत्यादी कार्यक्रम आयोजित करणे
9. ज्येष्ठ नागरिकांसाठी हेल्थ चेक अप कॅप आयोजित करणे व त्यांच्या स्वास्थ्यविषयक समस्या दूर करण्यासाठी पाठपुरावा करणे
10. ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध सेवा क्षेत्रांमध्ये उपलब्ध शासकीय/अशासकीय सेवांची/योजनांची माहिती देणे व ज्येष्ठ नागरिकांना सेवा–सुविधा–सोयी–सवलती उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न करणे.

**‘सहयोग’ कृतीगटः**

‘सहयोग’ प्रकल्पासाठी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभाग स्तरावर एक कृतीगट राहील. तसेच महाविद्यालयीन स्तरावर संबंधित महाविद्यालयाच्या आजीवन अध्ययन व विस्तार केंद्रांतर्गत प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली एक कृतीगट कार्यरत असेल. कृतीगटात महाविद्यालयातील प्रभारी प्राध्यापकांबरोबरच विविध क्षेत्रातून निवडण्यात आलेल्या व्यक्तींचा समावेश असेल.

**‘सहयोग’द्वारे महाविद्यालयीन स्तरावर आयोजित करावयाचे कार्यक्रम/उपक्रम**

1. कार्यक्षेत्रातील ज्येष्ठ नागरिकांसाठी संमेलन, कृतीसत्र, उद्‌बोधन सत्र, मार्गदर्शन शिबीरे इत्यादींचे आयोजन करणे. यामध्ये ज्येष्ठांची काळजी आणि समुपदेशन प्रशिक्षण, प्रथमोपचार प्रशिक्षण, आर्थिक व्यवस्थापन, ज्येष्ठांना आवश्यक असणाऱ्या पूरक सेवा प्रकल्पांचे मार्गदर्शन, कचरा व्यवस्थापन, जल व्यवस्थापन आणि जैविक खत निर्मिती प्रकल्प, ज्येष्ठ स्वयंसहाय्यता समूह निर्मिती इत्यादींचा समावेश करता येईल.
2. कथा–कथन, कवी संमेलन, गायन, वादन, नृत्य, व्याख्यान, प्रवचन, कीर्तन व इतर समाज प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करणे.
3. ज्येष्ठ नागरिकांच्या कौशल्यास, सृजनशीलतेस व कृतिशीलतेस वाव देण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे. ज्येष्ठांनी तयार केलेल्या वस्तू, कलाकृती, पेंटींग इत्यादींचे प्रदर्शन भरविणे व त्यांची विक्री करणे.
4. ज्येष्ठ नागरिकांसाठी आवश्यकतेनुसार हेल्थ चेकअप कँप (रोग निदान शिबीर), ऑपरेशन कँप, औषधी वितरण शिबीर, मार्गदर्शन शिबीरे इत्यादींचे आयोजन करणे.
5. ज्येष्ठ नागरिकांसाठी केंद्र शासन व राज्य शासनाद्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना/प्रकल्प इत्यादींच्या माहितीसाठी शिबीरांचे आयोजन करणे व ज्येष्ठ नागरिकांना या योजनांचे लाभार्थी बनण्यासाठी सर्व स्तरावर सहाय्य करणे.
6. शासकीय/अशासकीय/सेवाभावी संस्थांमधील अधिकारी/पदाधिकारी/संपर्क व्यक्ती यांचेबरोबर समन्वय स्थापित करून सर्व प्रकारच्या कल्याणकारी योजनांचा लाभ ज्येष्ठांपर्यत पोहचविणे. सर्व प्रकारच्या कार्यक्रमांमध्ये/उक्रमांमध्ये ज्येष्ठांचे सक्रीय सहकार्य अपेक्षित आहे. किंबहुना त्यांच्या सक्रीय सहभागानेच सर्व कार्यक्रम/उपक्रम आयोजित करावयाचे आहेत.

ज्येष्ठांच्या फावल्या वेळेचा सदुपयोग करून उत्पादकता वाढविणे व त्यांच्या कला–गुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देऊन त्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत करणे, हे प्रत्येक कार्यक्रमामागील उद्दिष्ट असेल, ही बाब नजरेआड करता येणार नाही.

**कार्यक्रमांचे/उपक्रमांचे आयोजन**

कोणत्याही कार्यक्रम/उपक्रम आयोजनाच्या तीन पायऱ्या असतीलः–

**1. नियोजन (Planning)**

प्रत्येक कार्यक्रमाचे/उपक्रमाचे आयोजनापूर्वी संबंधित आयोजनाची उद्दिष्टे, उपलब्ध साधनसामुग्री, मनुष्यबळाची उपलब्धता आणि आर्थिक तरतूद या सर्व बाबी विचारात घेणे अपेक्षित आहे. नियोजन सामान्यतः 10–15 दिवस अगोदरच झाल्यास ते उपकारक ठरते. नियोजन महाविद्यालयीन स्तरावर झाल्यानंतर तशी सूचना विभागास द्यावी.

**2. कार्यवाही (Execution)**

कार्यक्रम/उपक्रमाचे आयोजन अतिशय कौशल्यपूर्वक करणे अपेक्षित आहे. यासाठी एखादा कार्यगट तयार करून विविध प्रकारच्या व्यवस्थेची/कामाची विभागणी झाल्यास ते उत्तम ठरते. या प्रकल्पातील सर्व कार्यक्रम/उपक्रम समाजोपयोगी असल्यामुळे महाविद्यालयाबरोबर समाजाच्या सर्वच गटांचा सहभाग आवश्यक आहे.

*कार्यक्रमाची/उपक्रमाची अंमलबजावणी नियोजनानुसार झाल्यास ती अधिक प्रभावी ठरते.*

### 3. *मूल्यमापन व अहवाल लेखन*

*कार्यक्रम/उपक्रम राबविल्यानंतर सहभागी व्यक्तींकडून संबंधित आयोजनाचे मूल्यमापन लेखी स्वरूपात करून घ्यावे. यामुळे प्रत्याभरण* (feed-back) *मिळते व आयोजनात राहिलेल्या त्रृटी पुढील नियोजनात दूर होण्यास मदत होते.*

*अहवाल लेखन मुद्देसूद स्वरूपात व सुमारे 1000–1200 शब्दात असावे. संबंधित उपक्रमाची छायाचित्रे तसेच वृत्तपत्रातील कात्रणांसहित* A4 *साइज कागदावर दोन्ही बाजुने प्रिंट (डीटीपी) केलेला अहवाल विभागाद्वारे निर्धारित केलेल्या मुदतीमध्येच विभागात सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या अहवालांचा समावेश विद्यापीठाच्या* Insentive Mark Scheme *मध्ये करता येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.*

# कल्याणकारी शासकीय योजना माहिती, मार्गदर्शन व समन्वयन प्रकल्प

# उन्नती

आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागाने केंद्र व राज्य शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ जनतेला व्हावा यासाठी महाविद्यालयांमध्ये **'कल्याणकारी शासकीय योजना माहिती, मार्गदर्शन, समन्वयन व निष्कर्ष'** या नावाने एक विस्तार सेवा प्रकल्प कार्यान्वित करण्याचे ठरविले आहे. या प्रकल्पास 'उन्नती' म्हणून संबोधण्यात येईल. प्रकल्पाची नियोजनपूर्वक आखणी करून, शासकीय विकास यंत्रणा व महाविद्यालय यांच्या परस्पर समन्वयातून विविध कल्याणकारी शासकीय विकास योजना जनसामान्यांपर्यंत पोहचविण्याचे काम महाविद्यालयांना **'उन्नती'**च्या माध्यमातून करावयाचे आहे. अर्थातच या कल्याणकारी शासकीय योजनांची माहिती संकलित करणे, विकास योजनांची माहिती समाजातील पात्र लोकांपर्यंत पोहचविणे, पात्र व्यक्तींना योजनेचे लाभार्थी होण्यासाठी सल्ला देऊन मदत करणे व ज्या व्यक्तींनी शासकीय योजनांचा लाभ घेतला, त्यांच्या जीवनात झालेल्या परिवर्तनाचादेखील अभ्यास करणे इत्यादी कामे महाविद्यालयांना या विस्तार सेवा प्रकल्पातून करावी लागतील.

## 'उन्नती' प्रकल्पाची उद्दिष्टे

1. **महाविद्यालयांना विद्यार्थ्यांच्या माध्यमातून राज्याच्या विकास प्रक्रियेत सहभागी करून घेणे**
2. **विद्यार्थ्यांना शासनाच्या कल्याणकारी विकास योजनांची माहिती करून देणे**
3. **शासनाच्या कल्याणकारी योजनांच्या कार्यान्वयानाचा समीक्षात्मक अभ्यास करणे**
4. **केस स्टडीज/संशोधन प्रकल्पांच्या माध्यमातून विद्यार्थी व प्राध्यापकांच्या संशोधन वृत्तीस चालना देणे.**

आपले राष्ट्र आणि त्यातील राज्ये कल्याणकारी असून जनतेच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक विकासासाठी विविध योजना राबवित असतात. समाजामधील काही **'लक्ष्य गट'** (Target Group) डोळयासमोर ठेवून, त्यांच्या जीवनात परिवर्तन घडवून त्यांना सुखी व समृध्द करण्यासाठी विविध कल्याणकारी योजना शासन आपल्या विकास यंत्रणांमार्फत कार्यान्वित करीत आहे. महाराष्ट्र शासनाने काही आपल्या स्तरावर तर काही केंद्र शासनाच्या मदतीने, असे जवळपास तेहतीस 'लक्ष्य गट' (Target Group) ठरवून त्यांच्यासाठी विविध विकास योजना कार्यान्वित केल्या आहेत. त्यामध्ये 1. अनुसूचित जाती 2. अनुसूचित जमाती 3. अल्पसंख्यांक 4. इतर मागासवर्गीय 5. ज्येष्ठ नागरिक 6. भटक्या व विमुक्त जाती 7. दारिद्रय रेषेखालील कुटुंब 8. मजूर 9. अपंग 10. महिला 11. कामगार 12. शेतमजूर 13. सुशिक्षित बेरोजगार 14. युवक आणि क्रीडा 15. बालक 16. अपघातग्रस्त 17. निराधार 18. आपत्तीग्रस्त 19. किशोरवयीन 20. प्रौढ नागरिक 21. अत्याचारग्रस्त 22. अनाथ 23. प्रकल्पग्रस्त 24. माजी सैनिक 25. कलाकार 26. ग्रामीण 27. वनमजूर 28. मच्छिमार 29. बेघर 30. अकुशल मजूर 31. शेतकरी 32. विद्यार्थी 33. अनाथ बालके इत्यादींचा समावेश आहे.

महाराष्ट्र शासनाच्या विविध शासकीय विकास यंत्रणांच्या माध्यमातून वरील लक्ष्य गटांसाठी विकासाच्या विविध योजना कार्यान्वित करण्यात येतात. 1. जिल्हाधिकारी 2. जिल्हापरिषद व पंचायत समित्या 3. उपविभागीय अधिकारी 4. तहसिलदार

5. महानगरपालिका 6. नगर पंचायत 7. ग्राम पंचायत 8. आरोग्य उपसंचालक व आर्थिक विकासासाठी स्थापण करण्यात आलेली मंडळे हयांच्या कार्यालयामार्फत सदर विकास योजना कार्यान्वित होतात. या संस्थांशी यादृष्टीनें संपर्क साधता येईल.

**लक्ष्यगट, विकास योजना आणि संपर्क कार्यालये याविषयीची सविस्तर माहिती पुस्तिका सोबत दिलेली आहे.**

**माहितीसाठी उदाहरणः**

| अ.क्र. | लक्ष्यगट | योजना | संपर्क कार्यालय/संपर्क अधिकारी |
|---|---|---|---|
| 1 | अनुसूचित जाती | प्रधानमंत्री आवास योजना | पंचायत समिती, गटविकास अधिकारी |
| 2 | अनुसूचित जाती | सिंचन विहीर | ग्राम पंचायत/उप जिल्हाधिकारी रोजगार हमी योजना |

## 'उन्नती' प्रकल्पांतर्गत महाविद्यालयांनी करावयाची कृती

1. सर्वप्रथम प्राचार्यांनी महाविद्यालयात एका समाजाभिमुख व सामाजिक कार्याची आवड असणाऱ्या अध्यापकाची आजीवन अध्ययन व विकास केंद्राचे 'प्रकल्प समन्वयक' म्हणून नियुक्ती करावी. महाविद्यालयातील आजीवन अध्ययन व विस्तार केंद्राकडून कार्यान्वित होणाऱ्या विविध प्रकल्पांपैकी 'कल्याणकारी शासकीय योजना माहिती, मार्गदर्शन, समन्वयन व निष्कर्ष, प्रकल्प उन्नती' हा एक विशेष प्रकल्प असेल.
2. प्रकल्प–समन्वयक अध्यापकांनी विद्यार्थ्यांना या प्रकल्पाविषयी माहिती देऊन प्रकल्पात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांची नोंदणी करावी. प्रकल्प कार्यान्वित करण्यापूर्वी प्रकल्पात विद्यार्थ्यांना करावयाच्या कार्याविषयी मार्गदर्शन करावे.
3. या प्रकल्पाकरिता आसपासची 5 गावे दत्तक म्हणून स्वीकृत करावी. ही गावं अन्य महाविद्यालयांनी घेतलेली नाही याची खात्री करून घ्यावी.

### (1) उन्नती अंतर्गत कार्यः

### उन्नती प्रकल्प कार्यान्वयनाचे टप्पे

1. सर्वप्रथम वर नमूद केलेल्या शासकीय विकास यंत्रणांकडून त्यांच्या मार्फत कार्यान्वित होत असलेल्या वैयक्तिक व सामुहिक विकास योजनांची माहिती विद्यार्थ्यांनी संकलित करावी. प्रस्तुत माहिती संबंधित कार्यालयांना प्रत्यक्ष भेटी देऊन किंवा शासनाच्या संकेतस्थळावर किंवा ॲपद्वारे प्राप्त करता येऊ शकेल. साधारणतः आपल्या महाविद्यालयाच्या परिसरात असलेल्या लक्ष्यगटासाठीच्या योजनांवर अधिक भर देऊन त्याविषयीची माहिती प्राधान्याने मिळवावी. जिल्हा माहिती अधिकारी कार्यालयाकडून आपणांस विकास योजनांची माहिती व प्रचारसाहित्य देखिल उपलब्ध होऊ शकेल. संकलित केलेली माहिती महाविद्यालयातील ग्रंथालयात व्यवस्थित ठेवून तिचा प्रचारासाठी वापर करावा.
2. संकलित केलेल्या विविध विकास योजनांच्या माहितीच्या आधारे लक्ष्य–गटासाठी (Target Group) या योजनांचा प्रचार महाविद्यालयांच्या परिसरातील गावांमध्ये किंवा वस्त्यांमध्ये करण्यासाठी काही उपक्रमांचे आयोजन करण्यात यावे. लोककल्याणार्थ शासनाच्या असंख्य योजना आहेत. शासन आपल्या परीने लाभार्थ्यांपर्यंत योजना पोहचविण्याचा प्रयत्न करते परंतु बहुसंख्य लोकांना योजनांची माहिती नसल्यामुळे ते योजनांच्या लाभापासून वंचित राहतात. महाविद्यालयाने प्रचारासाठी कार्य केल्यास अधिक लोकांना योजनांचा लाभ मिळू शकेल. योजनांच्या प्रचारासाठी गटचर्चा,

व्याख्यान, प्रचार साहित्याची प्रदर्शनी व पथनाटय किंवा माहितीपटांचा (Documentary) उपयोग करता येईल.

3. विविध विकास योजनांचा लाभार्थींना प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यासाठी त्यांना मार्गदर्शन करावयाचे आहे. त्यासाठी **लाभार्थी व योजना कार्यान्वित करणाऱ्या कार्यालयामध्ये विद्यार्थ्यांना समन्वयक म्हणून भूमिका पार पाडावयाची आहे.** योजनेसाठी अर्ज कसा आणि कोठे करायचा आहे, अर्जासोबत कोणती कागदपत्र सादर करावयाची आहेत, याविषयी लाभार्थींना मार्गदर्शनाची नितांत गरज असते. अर्ज Online पध्दतीने करावयाचा झाल्यास त्यासाठी संगणक प्रणालीच्या माध्यमातून अर्ज करण्यासाठीची सेवा महाविद्यालयात उपलब्ध करून देता येईल. लाभार्थींचा अर्ज योजनेसाठी मंजूर झाल्यावर लाभार्थीला योजनेकरिता आवश्यक मूळ कागदपत्रे तयार करण्यात मदत करावी. योजनेतून प्राप्त होणाऱ्या साधन सामुग्रीचा किंवा आर्थिक मदतीचा योग्य उपयोग होतो किंवा नाही, यावर विद्यार्थ्यांना देखरेख ठेवता येईल. थोडक्यात, **महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांना उन्नतीचे '<u>विकासदूत</u>' म्हणून कार्य करावयाचे आहे.**

   शासनाच्या काही योजना समग्र ग्रामविकासाच्या किंवा सामुहिक विकासाच्या असतात. अशा योजना प्राप्त करण्यासाठी ग्रामपंचायतींना मार्गदर्शन करून योजना मंजूर होण्यासाठी ग्रामपंचायत आणि संबंधित यंत्रणा ह्यांच्या मध्ये समन्वय करण्याचे कार्य विद्यार्थ्यांनी करणे अपेक्षित आहे.

4. विविध विकास योजनांच्या प्रचारासाठी प्रकल्पातील विद्यार्थ्यांनी आयोजित केलेल्या उपक्रमांचा अहवाल तयार करावा तसेच ज्या लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळाला, त्यांची नोंद ठेवावी. योजनेच्या सफलतेचे प्रमाण आणि त्याची कारणे अहवालात नमुद करण्यात यावे.
5. **सहभागी प्रत्येक विद्यार्थ्याने कमीत कमी 5 वेगवेगळया विकास योजनांची निवड करून वरीलप्रमाणे कार्य करावे.**

<u>लाभार्थींचे व्यष्टि–अध्ययन (CASE STUDY)</u>

'उन्नती' प्रकल्पांतर्गत शासनाच्या कल्याणकारी योजनेचा प्रत्यक्ष लाभ घेणाऱ्या लाभार्थींचा शोध घेऊन, त्या लाभार्थींना झालेल्या लाभाविषयी **पाच व्यष्टि–अध्ययन अहवाल (Case Study Report) प्रकल्पात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना तयार करावे लागतील.** ते मूल्यांकनासाठी महाविद्यालयाकडे सादर करावे लागतील. **<u>या पाच व्यष्टि–अध्ययन अहवालांच्या</u>** <u>(Case Study Report)</u> **<u>मूल्यांकनावर आधारित विद्यार्थ्यांना Rubrics (गुणदर्शक तक्ता) प्रमाणे प्रोत्साहनपर गुणांक देण्यात येतील.</u>**

1. विद्यार्थ्याला प्रकल्प समन्वयकांच्या मार्गदर्शनाखाली विवरणात नमूद केलेल्या शासकीय योजनांचा नजीकच्या काळात लाभ घेणाऱ्या पाच लाभार्थींची वास्तविक (Actual) माहिती संबंधित कार्यालयाकडून प्राप्त करून घ्यावी लागेल. या माहितीमध्ये संबंधित लाभार्थ्यांचे नाव, पत्ता व लाभ घेतलेल्या योजनेचा तपशील असावा.
2. नंतर विद्यार्थ्याला प्रत्यक्ष लाभार्थींची भेट घेऊन त्यांची मुलाखत घ्यावी लागेल. या मुलाखतीमधून त्यांनी योजनेचा लाभ कसा प्राप्त केला, त्यासाठी कोणकोणत्या कार्यालयांशी संपर्क करावा लागला, अर्ज केल्यापासून किती दिवसात योजना मंजूर झाली, योजना प्राप्त करतांना कोणकोणत्या अडचणींचा सामना करावा लागला, शासकीय कर्मचाऱ्यांचे सहकार्य कसे लाभले आणि लाभार्थींच्या जीवनात योजनेमुळे झालेले परिवर्तन याविषयीची माहिती काढून त्याचे टिपण तयार करावे लागेल. तसेच लाभार्थी व त्याच्या कुटुंबाचे एक छायाचित्र, वस्तूच्या स्वरूपात लाभ झाला असेल तर त्याचे छायाचित्र, घरकुल

*मिळाले असेल तर त्याचे छायाचित्र, व्यवसाय मिळाला असेल तर त्याची छायाचित्रे घ्यावीत. आजकाल विद्यार्थ्यांकडे मोबाईल असल्यामुळे लाभार्थीची मुलाखतसुध्दा छायाचित्रीत/ध्वनिमुद्रित* (Audio/Video Recording) *करता येईल. (प्रश्नावली सोबत जोडली आहे)*

***व्यष्टि – अध्ययन अहवाल* (Case Study Report) *तयार करणे:***

***लाभार्थींच्या प्रत्यक्ष भेटीतून व मुलाखतीतून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे प्रकल्प समन्वयक प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना पाच लाभार्थीचे व्यष्टि–अध्ययन अहवाल* (Case Study Report) *तयार करून ठराविक मुदतीत महाविद्यालयात सादर करावे लागतील.***

प्रपत्र 'ड/1'

# आजीवन अध्ययन व विस्तार विभागाद्वारे कार्यान्वित प्रकल्पांच्या माहिती संकलनाकरिता प्रश्नावली

### प्रतिसादकर्त्याची माहिती ......................योजनेबाबत माहिती

१. प्रतिसादकर्त्याचे पूर्ण नाव ____________________

२. प्रतिसादकर्त्याचा पत्ता

____________________

३. ग्रामपंचायतीचे नाव ____________ तालुका ____________ जिल्हा ________

४. रहिवासाचे ठिकाण–ग्रामीण/शहरी

५. प्रतिसादकर्त्याची जन्मतारीख ____________

६. प्रतिसादकर्त्याचा आधार क्रमांक ____________

७. प्रतिसादकर्त्याची शैक्षणिक पात्रता–(प्राथमिक/माध्यमिक/उच्चमाध्यमिक/पदवी/पदव्युत्तर/आचार्य पदवी/इतर) ____________

८. प्रतिसादकर्त्याचा प्रवर्ग– (SC/ST/OBC/OPEN/VJNT/Minority)

९. लिंग – (पुरूष/स्त्री/तृतीयपंथी) ____________

१०. प्रतिसादकर्त्याचा ई–मेल(असल्यास) ____________

११. प्रतिसादकर्त्याचा भ्रमणध्वनी क्रमांक ____________

१२. कुटुंबाची एकूण सदस्य संख्या किती आहे? ____________

१३. कुटुंबामध्ये काम करणाऱ्या (कमावणारे) सदस्यांची संख्या किती? ____________

१४. **कौटुंबिक विवरण**

| अनु. क्र. | नाव | नातं | लिंग | वय | शिक्षण | मुख्य व्यवसाय | उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | | | |
| 2 | | | | | | | |
| 3 | | | | | | | |
| 4 | | | | | | | |
| 5 | | | | | | | |

१५. प्रतिसादकर्त्याचे सर्व स्रोतांपासून मिळणारे वार्षिक उत्पन्न किती आहे? ____________

१६. कुटुंबाचे एकूण वार्षिक उत्पन्न किती आहे? ____________

१७. प्रतिसादकर्त्याकडे शेती आहे का? (होय/नाही) ____________

१८. असल्यास एकूण क्षेत्रफळ (एकर मध्ये) ____________

१९. शेतीचा प्रकार– (बागायती/कोरडवाहू)

२०. प्रतिसादकर्त्याचे उत्पन्नाचे स्त्रोत – (शेती/नोकरी/व्यवसाय/स्वयंरोजगार/इतर) ________

२१. आपणास ____________ या सरकारी कल्याणकारी योजनांबद्दल माहिती आहे काय? (होय/नाही) (कोणत्याही एका योजनेचे नाव लिहावे.)

२२. होय असल्यास, योजनांचा लाभ घेतला आहे का? (होय/नाही) ____________

२३. लाभ घेतलेल्या योजनांची माहिती कुठून मिळाली? (वर्तमानपत्र, रेडिओ, टीव्ही, ग्रामसेवक, मोबाईल, भितीपत्रके, सरकारी शिबिरे, इतर) ____________

२४. योजनेचा लाभ कोणत्या वर्षात झाला (लाभ घेतला असल्यास) ____________

२५. योजनेची उदिदष्टे काय होती? ____________

२६. योजना कोणत्या विभागाकडून मंजूर झाली ?

२७. त्या विभागाचे नाव व पत्ता ____________

२८. योजनेव्दारा किती आर्थिक मदत झाली? ____________

२९. स्थावर किंवा जंगम मालमत्ता प्राप्त झाली असल्यास त्याविषयीची माहिती ____________

३०. शासकीय याजनेचा/योजनांचा लाभ घेण्याकरिता कोणकोणत्या कार्यालयाशी संपर्क करावा लागला?

____________________________________

३१. अर्ज केल्यापासून योजना किती दिवसात योजना मंजूर झाली ? __________

३२. योजनेचा लाभ घेण्याकरिता शासकीय कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले काय? (होय/नाही)______________

३३. योजनांचा लाभ घेताना अडचणी आल्यात का? (होय/नाही)

३४. अ) कोणत्या स्थरावर अडचणी आल्यात (जिल्हा प्रशासन स्थरावर/तहसिक कार्यालय स्थरावर/ग्रामपंचायत स्थरावर)

ब) कुठल्या प्रकारच्या अडचणी आल्यात ____________________________

३५. योजना प्राप्त झाल्यामुळे लाभार्थ्यांच्या जीवनात झालेले परिवर्तन

________________________________________________________________

३६. जर योजनेचे लाभ घेतले नसेल तर सरकारी योजनांची लाभ न घेण्याची कारणे

________________________________________________________________

३७. आपणास योजनेचे लाभ घेण्याकरिता सरकारकडून मदतीची आवश्यकता आहे काय? (होय/नाही)

३८. आपल्याला रोजगाराच्या प्राप्तीसाठी इतर कौशल्य आत्मसात करायचे आहे काय? (होय/नाही)

३९. असल्यास कुठल्या प्रकारचे? ______________________________________________________

४०. आपली आर्थिक स्थिती उंचावण्याकरिता काही जोडधंदा किंवा इतर व्यवसाय करायची इच्छा आहे का? (होय/नाही)

४१. आपल्याला ग्रामसभेसंबंधी माहिती आहे का? (होय/नाही)

४२. आपल्याला ग्रामसभेची अधिकार आणि कर्तव्ये माहित आहे का? (होय/नाही)

४३. आपल्या गावात नियमित ग्रामसभा घेतली जाते का? (होय/नाही)

४४. विद्यापीठाव्दारे चालविण्यात येणाऱ्या विविध कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रम किंवा योजनांची माहिती आहे काय?

४५. असल्यास कुठल्या प्रकारच्या ______________

४६. आपण विद्यापीठाव्दारे चालविण्यात येणाऱ्या विविध कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रमांपैकी कोणत्या अभ्यासक्रमाकरिता इच्छुक आहात? ________________________________

***जर योजना प्राप्त झाले असल्यास लाभार्थ्यांच्या जीवनात झालेले परिवर्तन याविषयीचे सविस्तर अहवाल विद्यार्थ्यांने प्रत्येकी 500 शब्दात सादर करावेत. त्यासोबतच छायाचित्रेही* (Geotagged Photographs) *संलग्नित करावी अहवालाच्या शेवटी विद्यार्थ्याने आपला निष्कर्ष नमूद करावा.***

# कौशल्य विकास प्रकल्प

# सक्षम

***(To be covered only under OE / SEC and not under CC)***

### पार्श्वभूमी

*कौशल्य म्हणजे कोणतेही कार्य कमीतकमी साधनांचा व कमीतकमी मनुष्यबळाचा वापर करून कमीत कमी वेळेत नीट–नेटकेपणे पूर्ण करण्याची क्षमता होय. केवळ पुस्तकी शिक्षणाने व्यक्ती जीवनात यशस्वी होऊ शकत नाही. आजच्या जागतिकीकरणाच्या युगात मनुष्य जीवनाचा दर्जा उंचावत असला तरी आशा–अपेक्षा–आकांक्षा यांच्या विस्फोटामुळे मनुष्यजीवन अधिक गुंतागुंतीचे झाली आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानातील अभूतपूर्व प्रगतीमुळे यांत्रिकीकरण पण वाढले आहे. अनेक प्रकारची यंत्रे/उपकरणे नजिकच्या भविष्यात आपले जीवन व्यापून टाकणार आहेत. संगणक, मोबाईल इत्यादी अनेक यंत्रे आणि उपकरणांच्या लहान–सहान दुरूस्तीसाठी प्रत्येक वेळी प्रशिक्षीत तंत्रज्ञ उपलब्ध असेलच असे नाही, शिवाय ते आर्थिक दृष्ट्याही परवडण्यासारखे नसते. आधुनिक जीवनाच्या विविध क्षेत्रांशी संबंधित कौशल्ये अवगत करणे आता काळाची गरज झाली आहे. बेकारीची स्थिती लक्षात घेता प्रत्येकास शिक्षण घेतल्यानंतर नोकरी लागण्याची शक्यता दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. अर्थात स्वतःचा लहान सहान व्यवसाय सुरू करून स्वावलंबी बनण्यासाठी सुध्दा कौशल्ये आत्मसात करणे गरजेचे आहे. ही गरज लक्षात घेऊनच राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेत स्वावलंबनाचा पुढील मंत्र दिला आहे.*

*जीवनाच्या गरजा संपूर्ण । निर्वाहाचे एकेक साधन*
*संबंधित विषयाचे समग्र ज्ञान। यांचा अंतर्भाव शिक्षणी।।*
*जीवनाचे प्रत्येक अंग। शिकवावा महत्वपूर्ण उद्योग।*
*काम करावयाची चांग। लाज नसावी विद्यार्थ्या।।*

*अमेरिकेला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज माहित नसले तरीही या मंत्राचा पुरेपूर अवलंब करून या देशाने अभूतपूर्व प्रगती साधली आहे. तेथे विद्यार्थी लहान–सहान कौशल्ये आत्मसात करून स्वतःच्या परिश्रमाने मिळालेल्या पैशातून शिक्षण घेत असतात. महत्वाची गोष्ट म्हणजे आपल्या देशात परिश्रमाची लाज बाळगणारा विद्यार्थी अमेरिकेत गेल्यानंतर परिश्रमाचे महत्व शिकतो व परिश्रम करून स्वावलंबी बनतो.*

*कौशल्यप्राप्ती ही स्वावलंबनाची गुरुकिल्ली आहे. ही बाब लक्षात घेऊन भारत सरकारच्या आणि महाराष्ट्र सरकार कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयतर्फे 15 जुलै 2015 पासून 'प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना (PMKVY)' प्रारंभ करण्यात आली आहे. या योजने अंतर्गत देशातील 14 राज्यांमध्ये 2250 कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्रे प्रारंभ करण्यात आली असून या योजनेचा विस्तार देशभर होत आहे. काळाची गरज लक्षात घेऊन विद्यापीठ अनुदान आयोगाने बाराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये (2012-2017) 350 रोजगाराभिमुख/व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम विद्यापीठ व महाविद्यालयांमध्ये प्रारंभ करण्याची शिफारस केली होती. त्यानुसार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात अनेक अभ्यासक्रम राबविले जात आहेत.*

*विद्यापीठाद्वारे प्रारंभ करण्यात आलेले कौशल्य विकास अभियान म्हणजे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या तत्वज्ञानाचे अधिष्ठान, विद्यापीठ अनुदान आयोगाचे व्यवसायाधिष्ठित अभ्यासक्रम व भारत सरकारच्या 'स्कील इंडिया मिशन' यांचा त्रिवेणी संगम होय.*

**उद्दिष्टे**

1. कठोर कौशल्ये, मृदु कौशल्ये व जीवन कौशल्यांची माहिती देऊन त्यांचे महत्व पटवून देणे
2. विविध कौशल्यांवर आधारित अभ्यासक्रम यशस्वीपणे राबविणे
3. कौशल्य विकासासाठी उपक्रमांचे/प्रकल्पांचे/कार्यशाळांचे नियोजन करणे व ते व्यवस्थितपणे आयोजित करणे
4. कौशल्य प्रशिक्षणासाठी साधन–सामुग्री व मनुष्यबळाची व्यवस्था करणे
5. विद्यापीठातील/महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना विविध प्रकारची कौशल्ये आत्मसात करण्याकरीता सर्वतोपरी मदत करणे.
6. कौशल्यांच्या कार्यक्षेत्रात कार्यरत शासकीय/अशासकीय/स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने कौशल्ययुक्त समाज निर्माण करण्याच्या राष्ट्रीय कार्यास हातभार लावणे.

**कौशल्यांचे प्रकार**

कौशल्यांचे प्रामुख्याने तीन प्रकार असतात.

1) **कठोर कौशल्ये (Hard Skills)**

बहुधा यंत्राशी/उपकरणाशी संबंधित असतात उदा. फ्रिज/ए.सी. मेकेनिक, संगणक दुरूस्ती, मोटर वाहन दुरूस्ती, बागकाम, टेलरिंग आणि याप्रमाणे इतर.

2) **मृदु कौशल्ये (Soft Skills)**

बहुधा ज्ञान आणि बैध्दिक बाबीशी संबंधित असतात. उदा. संगणक कार्यक्रम (Software) तयार करणे, पत्रकारीता, वेब पेज डिझायनिंग आणि याप्रमाणे इतर.

3) **जीवन कौशल्ये (Life Skills)**

एखाद्या व्यक्तीने कितीही कौशल्ये आत्मसात केली परंतु त्याचेकडे जीवन कौशल्ये नसतील तर अशी व्यक्ती यांत्रिक स्वरूपाची राहील व जीवनात यशस्वी होऊ शकणार नाही.

**जीवन कौशल्याचा अर्थ**

एक व्यक्ती व समाजाचा महत्वपूर्ण घटक म्हणून स्वतःच्या कुटुंबात व समाजात वावरताना आणि इतर सर्व घटकांबरोबर समायोजन साधण्यासाठी दैनंदिन जीवनात उपयोगी पडणारी कौशल्ये म्हणजे जीवन कौशल्ये होत. उदा. संप्रेषण कौशल्य, समस्या समाधान कौशल्य इत्यादी.

एक मनुष्य म्हणून जीवनात/व्यवसायात यशस्वी होण्यासाठी खरेतर शेकडो कौशल्ये आवश्यक असतात. जागतिक स्वास्थ्य संघटनाद्वारे (WHO) पुढील 10 जीवनकौशल्ये, गाभाभूत जीवन कौशल्ये म्हणून प्रस्तावित करण्यात आली आहेत.

१. <u>**समानुभूती**</u> (Empathy)

एखादा दुःखद प्रसंग आल्यास संबंधित व्यक्तीस जसे वाटते नेमके तसेच वाटणे हे समानुभूतीचे द्योतक आहे. समानुभूती म्हणजे परभावना प्रवेश. दुसऱ्यांच्या भावना समजुन घेण्याची क्षमता अत्यंत महत्वपूर्ण ठरते कारण त्यामुळे परस्परसंबंध जिव्हाळ्याचे होतात.

२. <u>**तार्किक विचार**</u> (Critical thinking)

एखाद्या बाबीसंबंधी आपले मत म्हणजे विचार होय. कोणत्याही बाबतीत कल्पनेच्या/भावनेच्या आहारी न जाता त्या बाबीचे/घटनेचे वस्तुनिष्ठ विश्लेषण करून सुयोग्य मत बनविण्याची क्षमता म्हणजे तार्किक विचार क्षमता होय.

३. ***<u>सृजनशील विचार</u>*** (Creative Thinking)

*सृजनशीलता हा मानव जीवनाच्या विकासाचा आधार होय. सृजनशीलतेचे चार महत्वपूर्ण निकष असतात.*

*3.1)* ***<u>मौलिकता</u>*** (Originality)— *एखादा विचार किंवा एखादी कल्पना, एखादे कार्य जे नाविण्यपूर्ण व समाजोपयोगी असेल तर ते मौलिक मानले जाते.*

*3.2)* ***<u>कल्पनांची लवचिकता</u>*** (Flexibility) *कल्पना लवचिक असल्याशिवाय नव—नवीन गोष्टी पुढे येणार नाहीत.*

*3.3)* ***<u>कल्पनाप्रवाह</u>*** (Fluency) *कल्पनेमध्ये विविधता असल्याशिवाय नवीन गोष्टी शोधता येणार नाहित.*

*3.4)* ***<u>कल्पनाविस्तार</u>*** (Elaboration) *मनात आलेल्या कल्पनांचा विस्तार केल्याशिवाय नाविण्यपूर्ण गोष्टी शोधता येत नाहित.*

४. ***<u>निर्णय क्षमता</u>*** **<u>(Dicision Making)</u>**

*एखादया व्यक्तीबाबत/परिस्थितीबाबत/घटनेबाबत सारासार विचार करून हितकारक निर्णय घेण्याचे कौशल्य अत्यंत महत्वपूर्ण ठरते. ठराविक कालावधीत योग्य निर्णय किंवा कोणताही निर्णय न घेतल्यामुळे संकटपूर्ण स्थिती निर्माण होते. निर्णयक्षमता कौशल्यामध्ये पुढील चार पायऱ्या समाविष्ट असतात.1. नियोजन 2. प्रत्यक्ष स्थितीचे आकलन 3. कार्यवाही 4. नियंत्रण. कोणताही निर्णय घेतांना त्याचे सकारात्मक व नकारात्मक परिणाम काय होतील याचा आढावा घेणे गरजेचे असते.*

५. ***<u>समस्या समाधान क्षमता/कौशल्य</u>*** **<u>(Problem Solving Ability)</u>**

*त्रास, चिंता, दुःख इत्यादी नकारात्मक बाबींचा उगम जेथून होतो ती घटना किंवा परिस्थिती म्हणजे समस्या होय. मनुष्य जीवनात समस्या ह्या येतच असतात. त्या आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक व नैसर्गिक इत्यादी प्रकारच्या असू शकतात. बरेचदा मनुष्य स्वतःच समस्या निर्माण करतो, निर्माण झालेली समस्या सोडविण्याचा प्रयत्न करीत नाही व दोष मात्र नशीबास देतो.*

*समस्या समाधान क्षमता म्हणजे समस्यात्मक परिस्थितीमध्ये अशी पध्दती यशस्वीपणे राबविण्याची क्षमता की ज्यामुळे सर्व अडचणी दूर होऊन निश्चित केलेले उद्दिष्ट साध्य करता येते.*

***समस्या समाधान प्रकियेत पुढील पायऱ्यांचा समावेश होतो***

| | |
|---|---|
| *स* | → *समस्येची ओळख* |
| *म* | |
| *स्या* | → *समस्या परिभाषित करणे* |
| *स* | → *कारण मीमांसा* |
| *मा* | → *संभाव्य उपायांचा शोध* |
| *धा* | → *उपायांची अंमलबजावणी* |
| *न* | → *प्रभावशीलतेचे मूल्यमापन* |

*जीवनात उद्भवणाऱ्या समस्यांमुळे काही व्यक्ती उद्ध्वस्त होतात. तर काही व्यक्ती समर्थपणे समस्यांचा सामना करतात. एखाद्या समस्यात्मक स्थितीत एखादी व्यक्ती वाकडी वागेल हे त्याच्या मनोधैर्यावर अवलंबून असते. एखादया व्यक्तीने कितीही उच्च शिक्षण घेतले असेल परंतु त्याचे अंगी समस्या समाधान क्षमता नसेल तर त्याचे शिक्षण फारसे उपयोगी ठरणार नाही व जीवनोपयोगी तर निश्चितपणे असणार नाही.*

६. ***संप्रेषण*** (Communication)

*शाब्दिक व अशाब्दिक साधनांच्या माध्यमातून संदेश पाठविण्याची व प्राप्त करण्याची (देवाण घेवाण) प्रक्रिया म्हणजे संप्रेषण होय. संप्रेषण ही द्विधृवात्मक प्रक्रिया आहे. संप्रेषण ही कला व कौशल्य दोन्ही आहे. वर्तमान काळात यशस्वी व्हायचे असेल तर प्रभावी संप्रेषण कौशल्य आत्मसात करणे नितांत गरजेचे आहे.*

*संप्रेषण प्रक्रियेत पुढील पायऱ्यांचा समावेश होतो.*

| | |
|---|---|
| *संप्रेषणर्ता* | Sender |
| *कूट लेखन* | Encoding |
| *संदेश* | Message |
| *माध्यम* | Medium |
| *संदेश प्राप्तकर्ता* | Receiver |
| *कूट वाचन* | De-coding |

*संप्रेषण प्रक्रियेतील घटक*

*संप्रेषणाची अनेक प्रतिमाने असून हा एक स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे. संप्रेषण हा परस्पर संबंधाचा दुवा आहे. संप्रेषणाशिवाय मनुष्य जीवन निरर्थक ठरेल.*

७. ***आंतरव्यक्ती संबंध* (Interpersonal Relation)**

*मनुष्य हा एक समाजशील प्राणी असल्यामुळे परस्पर जिव्हाळयाचे संबंध स्थापित करण्याने ते टिकवून ठेवण्याचे कौशल्य त्याचे अंगी असणे नितांत गरजेचे आहे. जागतिकीकरणामुळे दिवसेंदिवस परस्परावलंबित्व वाढत जाणार आहे, ही गोष्ट येथे लक्षात घेण्यासारखी आहे.*

८. ***ताण–तणावाचे व्यवस्थापन* (Stress Management)**

*वर्तमान स्थितीत मनुष्य जीवन अतिशय गुंतागुंतीचे झाल्यामुळे नोकरी करणाऱ्या किंवा व्यवसाय करणाऱ्या व्यक्तीवर अनेक प्रकारचा ताण असतो. या ताण–तणावावर मात करण्याचे कौशल्य आत्मसात केले नाही तर त्याचे मानसिक स्वास्थ्याविषयक परिणाम नकारात्मक स्वरूपाचे असतात. मानसिक स्वास्थ्य बिघडले तर शारीरिक स्वास्थ्यसुध्दा बिघडते.*

९. ***भावनांचे व्यवस्थापन* (Emotions Management)**

*डॅनिअल गोलमन* (Daniel Goleman, 1995) *यांनी संशोधनातून सिध्द केले आहे की, मनुष्य जीवनात यशस्वी होण्यासाठी बुध्दिमत्तेचा* (I.Q.) *वाटा फारतर 20 टक्के असतो. तर भावनात्मक बुध्दिमत्तेचे* (Emotional Intelligence) *योगदान मात्र 80 टक्के असू शकते. बुध्दिमत्ता ही नैसर्गिक देणगी आहे. तर भावनात्मक बुध्दिमत्ता ही स्व–अर्जित कौशल्य/क्षमता आहे. भावनात्मक बुध्दिमत्ता असलेल्या व्यक्तीच भावनांचे व्यवस्थापन सुयोग्य प्रकारे करू शकतात.*

१०. ***स्वयं मूल्यमापन* (Self Assessment)**

*बहुतेक वेळा मनुष्य स्वतःचे मूल्यमापन करण्यात अपयशी ठरतो कारण असे करताना मनुष्य एकतर स्वतःला अवास्तव महत्व देतो* (Over estimation of self) *किंवा कमी महत्व देतो* (Under-estimation of self) *स्वतःच्या क्षमतांचे आणि उणीवांचे आकलन करण्याचे कौशल्य अंगी असलेली व्यक्ती जीवनात यशस्वी ठरते.*

***अहवाल सादरीकरण***

*विहित निर्देशानुसार शैक्षणिक सत्रात राबविण्यात आलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमांचा/प्रकल्पांचा उपक्रमांचा अहवाल विभागास दिलेल्या मुदतीत सादर करणे आवश्यक आहे, याची नोंद घ्यावी.*

***टीप***– *1. जीवनकौशल्ये हा अभ्यासाचा एक स्वतंत्र विषय असून दिलेली माहिती अत्यंत संक्षिप्त स्वरूपाची आहे. संबंधित व्यक्तींनी/तज्ञ प्राध्यापकांनी आपल्या स्तरावर माहिती मिळवून ती इतरांपर्यंत पोहोचविणे अपेक्षित आहे. एवढेच नव्हे तर जीवन कौशल्यांमध्ये समायोजन क्षमता, अभिप्रेरण, सहकार्य, सेवाभावी वृत्ती, संघर्ष व्यवस्थापन, नेतृत्व इ. अनेक कौशल्यांचा समावेश करणे अपेक्षित आहे.*

*2. वरील जीवनकौशल्य शिकविण्यासाठी महाविद्यालयीन स्तरावर या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींच्या सहकार्याने महाविद्यालयाने विद्यार्थ्यांसाठी अल्पकालीन अभ्यासक्रम आयोजित करावा.*

***कौशल्याधिष्ठित विविध अल्पमुदतीचे व्यावसायिक अभ्यासक्रम***

*आजीवन अध्ययन व विस्तार विभागाद्वारा कौशल्याधिष्ठीत अल्पमुदतीचे व्यावसायिक अभ्यासक्रम कार्यान्वित करण्यात येत आहेत. या संबंधीत संपूर्ण माहीती विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.*

*वरील अभ्यासक्रम महाविद्यालयांना आपले विद्यार्थी किंवा बाहेरील युवकांसाठी आयोजित करावयाचे आहेत. परंतु वरील अभ्यासक्रम आयोजित करण्यापूर्वी महाविद्यालयांना आजीवन अध्ययन व विस्तार विभागाकडे रीतसर प्रस्ताव सादर करावा लागेल. प्रस्ताव मंजूर झाल्यानंतरच हे अभ्यासक्रम महाविद्यालयांना विभागाने ठरवून दिलेले शुल्क आकारून विद्यार्थी वा युवकांना उपलब्ध करून देता येतील. जीवन शिक्षण अभियान व निरंतर शिक्षण अभ्यासक्रमांविषयीची नियमावली व आवेदन पत्र विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.*

Note :

Such course should be pre-approved from Department of Lifelong Learning and Extension by the college before the start of semester. Such course will be for 2 credits and the assessment of the same will be as per guidelines of Department of Lifelong Learning and Extension. The credits earned here can be considered under SEC or OE only.

If a student chooses any such course having more than 2 credits only 2 credits will be considered. In case the total marks for evaluation are more / less than 100, the marks will be proportionatly adjusted to 100 for SEC or OE as the case may be.